*NAVJYOT / Vol. XIII / Issue – I* *ISSN 2277-8063*

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचे मानसशास्त्र

**डॉ. करीम मुल्ला** सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
**डॉ. विवेक कोतेकर** सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश :-** *छत्रपती शिवाजी महाराज हे अस नाव आहे, ज्या नावाला केवळ महाराष्ट्रातच नवे तर अवघ्या जगात पराक्रमाच वलय आहे. महाराजांच्या जाज्वल्य व ऐतिहासिक कार्याला जगभरातून मान्यता मिळालेली आहे. त्यांना लाभलेल्या केवळ ५० वर्षाच्या कालावधीत माणूस इतकं प्रचंड व देदीप्यमान काम कसं करू शकतो हा इतिहासकारांनाच नाही तर सर्व क्षेत्रातील लोकांना पडलेला एक गहन प्रश्न आहे. केवळ ऐतिहासिक लढाया म्हणजे महाराजांचं कर्तुत्व नव्हे; तर आर्थिक, सामाजिक, राजकीय, न्यायिक, धार्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांनी केलेलं क्रांतिकारी परिवर्तन म्हणजे त्यांच कर्तुत्व होय. स्वराज्याची संकल्पना ही तत्कालीन काळात अशक्यप्राय गोष्ट होती. अस्मानी सुलतानी संकट, चोहोबाजूंनी शत्रूचा वावर, स्वकीयांची अनास्था अशा अनंत अडचणीना बाजूला सारून नव्याने स्वतःचं राज्य उभं करण ही महत्वपूर्ण ऐतिहासिक बाब आहे. कल्याणकारी, धर्मनिरपेक्ष, स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता आणि अखंडता या राज्यघटनेतील संकल्पनांचा कृतीशील व प्रत्यक्ष वापर शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात आपल्याला दिसून येतो. यासाठी शिवाजी महाराजांनी काय केलं ? शत्रूशी मानसिक लढा कसा दिला ? त्यांच्या स्वराज्याचं नेमकं मानसशास्त्र काय ? यासंबधी थोडक्यात आढावा प्रस्तुत लेखामध्ये घेण्यात आलेला आहे.*

**प्रस्तावना** :-

भारतीय इतिहासामध्ये प्राचीन काळापासून अनेक राजे-महाराजे राज्य करुन गेले. प्रत्येकाची राज्य करण्याची पध्दत वेगळी होती. प्रत्येकाची धर्म, नीती, राजव्यवस्था याबाबतची पध्दत वेगळी होती. या हजारो राजे-महाराजांमध्ये विशिष्टच नावं इतिहासात ठळकपणे अधोरेखित होतात किंवा त्यांच्या राजनीतीचा, युध्दनीतीचा, वारसा कायमस्वरुपी दिला जातो. यातीलच प्रमुख नांव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. महाराजांना आयुष्य लाभलं ते अवघं ५० वर्षाचं. सुरुवातीच्या काळातील वर्षे सोडली तर आयुष्य उरतं साधारण ३० ते ३५ वर्षाचं. या ३० ते ३५ वर्षाच्या काळात प्रचंड असं काम करुन ठेवणं ही महत्वपूर्ण बाब आहे. राजनीती, युध्दनीती, धर्मनीती, जलनीती, समाजकार्य, मानसशास्त्र, चारित्र्यसंपन्नता असा कोणता विषय नाही ज्यात महाराज पारंगत नव्हते. अशाप्रकारचे अलौकिक काम कसं काय होऊ शकतं? यासाठी ध्येयशक्ती, इच्छाशक्ती आणि प्रजाप्रेमाची तळमळ असावी लागते. इथल्या रयतेला स्वाभिमानानं आणि गुण्यागोविंदानं जीवन जगण्यासाठी स्वत:चे राज्य निर्माण करण्याची ओढ त्यात होती. या उद्दात भावनेतूनच स्वराज्य निर्माण झालं. महाराजांच्या कारकिर्दीमध्ये असे अनेक प्रसंग आहेत, जिथं शक्तीपेक्षा युक्ती कामी आली. जिथं मानसशास्त्र कामाला आलं. एकूणच विचार करता शत्रूला मानसिकदृष्टया पराभूत करण्यात महाराज पारंगत होते. यामुळे अनेक बलाढ्य लोकं, मी मी म्हणणारे सरदार मराठ्यांसमोर शरणागती पत्करायचे. पण मुळात विचार करता, ही स्वराज्याची स्थापनी झाली कशी? हे स्वराज्याचं बीज नेमकं पेरलं कसं गेलं? स्वराज्य निर्माण करण्यात महाराजांची भूमिका महत्वपूर्ण होतीच; यासाठी शहाजीराजे व जिजाबाई यांच्याही भूमिकांचा आढावा घेणे महत्वपूर्ण ठरते.

**स्वराज्याची संकल्पना** :-

शहाजीराजे हे वेरुळच्या मालोजी भोसले यांचे पुत्र होते. त्यांच्या नावाचा व पराक्रमाचा दबदबा हा शहाजहानपासून आदिलशाह व निजामशहा यांच्यापर्यंत होता. त्यांची पुणे सुपे व आजूबाजूचा परिसर अशी जहागीर फार मोठी होती. जिजाबाई या लखुजीराव जाधवांच्या कन्या असून त्या लहापणापासूनच स्वतंत्र विचारांच्या होत्या. पुढे निजामशहाने कपटाने लखुजीराव जाधवांची हत्या केल्यामुळे त्यांचा हा विचार अधिकच प्रबळ झाला. किती दिवस शाह्यांची चाकरी करणार? किती दिवस इतरांच्यात नोकरी करणार? आपल्यात शौर्य आहे, शक्ती आहे, युक्ती आहे, आपणही आपलं राज्य स्थापन करावं हा विचार शहाजीराजांच्या मार्फत त्यांना पूर्णत्वास न्यायचा होता. पण तत्कालीन परिस्थिती अशी होती की, चोहोबाजूंनी शत्रूनं वेढलेलं होतं. अशावेळी स्वतंत्र राज्याचा उठाव केला तर कदाचित शत्रू एक होऊन आपल्याला सहज नेस्तानाबूत करु शकतो हा विचार शहाजीराजांनी केला असावा. त्यामुळे त्यांच्या पुणे येथे असलेल्या जहागीरीत जिजाबाई व बालशिवाजी यांनी राहून स्वराज्य स्थापन करावे हा विचार पुढे आला. यामध्ये शहाजीराजानी शस्त्रास्त्रशास्त्रपारंगत, राजनीतीधुरंदर, कुटनीतीतज्ञ, विविधभाषापारंगत अशा जाणकार व तज्ज्ञ लोकांची फौज बेंगलोर वरून पुण्याला पाठवली आणि यातूनच स्वराज्याचं बी पेरलं गेलं.

**शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेची भूमिका :-**

कोणत्याही राज्यसत्तेला अधिसत्तेसाठी काही प्रतीकांची आवश्यकता असते. जसं कि, राष्ट्रध्वज, राजमुद्रा, राजदंड आणि सिंहासन. शहाजीराजे हे दूरदृष्टीचे होते. त्यांना आपलं स्वतंत्र राज्य असावं हे वाटणं साहजिकच होतं. पण तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन शिवाजी महाराजांच्या डोक्यात हा विचार त्यांनी पेरला. त्यामध्ये बेंगलोरवरुन पुणे येथे येत असताना त्यांनी राजमुद्रा तयार करुन दिली. ही राजमुद्रा काय आहे ?

॥ प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्व वंदिता
शाहसूनो: शिवस्यैष्या मुद्रा भद्राय राजते ॥

याचा अर्थ प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारी व विश्वाला वंद्य असणारी शहाजीपुत्र शिवाजीची मुद्रा लोककल्याणासाठी राज्य करत आहे.

आपण याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आजचं जग हे कार्पोरेट जग म्हणन ओळखलं जातं, इथं प्रचंड स्पर्धा वाढली आहे. सेकंदासेकंदाची लढाई सुरु आहे. त्यामुळे वेगवेगळ्या कलाकौशल्यांचा वापर सुरु झाला आहे. यामध्ये एक गोष्ट सेल्फ डेव्हलपमेंटच्या प्रशिक्षण कार्यक्रमांमधून ट्रेनिंग प्रोग्रॅम्समधून शिकवली जाते ती म्हणजे ध्येयनिश्चिती करणे (Goal setting). आपल्या जीवनात आपल्याला जे अचिव्ह करायचं आहे ते अगोदर निश्चित करणे व ते अचिव्ह करणे. जसं की आज बँका, कार्पोरेट कंपन्या, विमा कंपन्या इत्यादि क्षेत्रात टार्गेट्स दिली जातात. वीकली टार्गेट, मन्थली टार्गेट, चिअरली टार्गेट वगैरे. हे टार्गेट ठरवून मग ते अचिव्ह केलं जातं.

पण, हीच संकल्पना ३५० वर्षापूर्वी शहाजीराजांनी वापरल्याचं आपल्याला लक्षात येते. या राजमुद्रेकडं आपण बारकाईनं पाहिलं तर त्यात स्वराज्याचा आराखडा दिसेल. टार्गेट दिसेल, उद्दिष्ट दिसेल. राजमुद्रा ही स्वराज्याची ब्ल्यू प्रिंट होती. ही मुद्रा देऊन एकप्रकारे सूचित केलं होतं की, स्वतंत्र राज्य स्थापन करायचं आहे. स्वराज्याची निर्मिती करायची आहे. मग हे स्वराज्यं कसं असेल? हे स्वराज्य भोसल्यांचं, शिवाजीचं, शहाजींचं असणार नाही तर ते रयतेचं असणार आहे. लोकांच्या कल्याणासाठी असणार आहे. हे एक उद्दात, विश्वकल्याणकारी उद्दीष्ट त्यातून दिलं होतं.

आणि हे ध्येय, हे उद्दीष्ट समोर असल्यामुळेच स्वराज्याचा केंद्रबिंदू हा रयतेचं कल्याण हाच राहिला. शिवाजी महाराजांची आज्ञापत्रं, इतर जणांना लिहिलेली पत्रं यातून वारंवार उल्लेख केला जातो तो म्हणजे रयतेचे रक्षण व्हावे, रयतेची काळजी घ्यावी.

म्हणून शिवाजी महाराजांची राजमुद्रा ही सेल्फ डेव्हलपमेंट व मानसशास्त्र याचा एक उत्तम नमुना होती. तत्कालीन राज्यांच्या मुद्रांमध्ये एक आगळंवेगळं स्थान निर्माण करणारी होती.

**शिवाजी महाराजांची युध्दघोषणा :-**

प्रत्येक लढाईमध्ये सैनिकांचा जोश, हुरुप व उत्साह वाढवण्यासाठी युध्दघोषणांचा अवलंब प्राचीन काळापासून केला जात होता. युध्दघोषणा म्हणजे काय? तोंडातून जोरजोरात विशिष्ट नावाचा उच्चार करुन एक माहौल तयार करणे व त्या माहौलव्दारे शत्रूसैन्यावर दडपण आणून त्याला नामोहरम करणे. या युध्दघोषणांनी सैनिक एकमेकांचा उत्साह, हुरुप व आत्मविश्वास वाढवत असतात. युध्दामध्ये काय असतं? कापाकापी असते, साक्षात मरण समोर उभं असतं. अशावेळी कमकुवत मनाने लढाई जिंकू शकत नाही. इथं आत्मविश्वास भरपूर असावा लागतो. मग असा आत्मविश्वास देणारी युध्द घोषणा कोणती? असा आत्मविश्वास कोण देणार? तर शहाजी महाराजांपासून चालत आलेलं व त्यांनी सर्वाधिक वापरलेलं युध्द घोषणेचं नावं होतं 'हर हर महादेव'

तत्कालीन समाजात 'महादेव' ही एक पूज्यनीय देवता होती. महादेव म्हणजे काय? शंकर, त्या महादेवानं, शिवशंकरानं त्यावेळला प्रजेवर छत्र धरलं, शत्रूपासून प्रजेचं संरक्षण केलं. प्रजेची सर्वतोपरी काळजी घेतली. तसेच तो शिव संरक्षणकर्त्याबरोबर विध्वंसक व संहारक देखील आहे. त्याचं तांडव भल्या भल्या देवतांना कापरं भरवणारं आहे. त्या देवतेचं, शक्तीचं स्मरण करुन, त्याच्या नावाचा आगाज करुन जर आपण घोषणा दिली तर तोच आपल्याला ताकद देईल ही भावना मावळयांच्या मनात यायची. त्या जोरदार घोषणांमुळे एक धडकी भरवणारा नाद निर्माण होऊन अंगात बारा हत्तींचं बळ यायचं. त्यामुळंच कमी लोकांनी जास्त लोकांना हरवल्याचं काम त्या काळात झालं असावं. हे तंत्र शिवरायांनी त्यांच्या काळात प्रभावी वापरलं.

मावळयांना लढाईसाठी शस्त्रकलेबरोबर सर्व कला शिकवून झाल्यानंतर शिवाजी महाराजांनी एक गोष्ट सांगितली होती . लढाई सुरू झाल्यापासून लढाई संपेपर्यंत तोंडातून एकाच मंत्राचा उच्चार करायचा तो म्हणजे हर हर महादेव. ही पद्धत महाराजांनी त्या काळामध्ये रूढ केली होती. जे आपल्या मावळयांची अंगवळणी सवयच पडली होती. त्याचा परिणाम म्हणून मुठभर लोकांनी ढीगभर लोकांना हरवण्याचे काम इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी नोंदवलं गेलं.

सेल्फ डेव्हलपमेंटच्या क्षेत्रामध्ये 'पॉवर ऑफ अफरमेशन' नावाची एक संकल्पना आहे. या संकल्पनेचा अर्थ काय? माणसाच्या शब्दात प्रचंड ताकद असते. शब्द माणसाच्या जीवनात बदल घडवू शकतात. शब्द एकतर उर्जा देतातही उर्जा काढून घेतातही. शब्दाने एखाद्याला हुरुपही दिला जातो व मानअपमान ही केला जातो. हे शब्दांचं सामर्थ्य आहे. विसाव्या शतकात इमेल कोई या फ्रेंच उपचारतज्ञाने याचा वापर फ्रान्समध्ये प्रचंड प्रमाणात केला. आजही जगामध्ये सेल्फ डेव्हलपमेंटच्या ट्रेनिंगमध्ये हे तंत्र शिकवलं जातं.

मावळयांमध्ये जोश, ऊर्जा, उत्साह व आत्मविश्वास वाढवण्यासाठी या तंत्राचा महाराजांनी त्याकाळी ठरवून वापर केला होता. त्यामुळे हर हर महादेव ही घोषणा हत्तींचं बळ निर्माण करणारी व महाराजांच्या प्रभावी युध्दनीतीची आणि मानसशास्त्राच्या प्रभावी वापराची एक सामर्थ्यशाली साक्ष आहे.

**समारोप** :-

शिवाजी महाराजांच्या मानसशास्त्रावर आज अनेक पुस्तकं लिहिली गेली. अनेक कोर्सेस लावले गेले. त्यांनी त्या काळात जे कंलं, ते नेमकं कसं केलं याचा अंदाजच फक्त आपण लावू शकतो. कोणतंही युध्द हे केवळ शक्तीनं न लढता मानसशास्त्राचा वापर करुन कसं लढावं, प्रत्यक्ष जीवनामध्ये मानसशास्त्राचा वापर कसा करावा याचा एक वस्तूपाठच शिवाजी महाराजांनी आपल्याला घालून दिला आहे. त्यामुळे शिवचरित्राचा मानसशास्त्रीय अंगाने अभ्यास करून मला माझ्या आयुष्यात, माझ्या करिअर

डेव्हलपमेंटमध्ये, माझ्या कार्यक्षेत्रात शिवाजी महाराजांचं मानसशास्त्र कसं वापरता येईल याचा सर्वांकष विचार होणं गरजेचं आहे. शिवाजी महाराजांच्या उत्सवाबरोबरच त्यांचे विचार जर डोक्यात घेऊन मी जगायला लागलो तर आपण ज्या क्षेत्रामध्ये काम करत आहोत त्या क्षेत्रात आपली निश्चितच एक आगळीवेगळी ओळख निर्माण होणार आहे. शिवाजी महाराजांचे युद्धशास्त्राविषयीचे विचार आधुनिक राष्ट्र-राज्य सत्तेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेतच; तसेच लोकशाही शासनामध्ये जी स्वातंत्र्ये दिली जातात त्याही दृष्टीने महत्वाचे आहेत. आजच्या शिवराज्याभिषेकाच्या 350 व्या वर्धापनदिनाच्या औचीत्याने यावर अधिकाधिक मंथन होऊन मला माझं आयुष्य हेल्थ, वेल्थ व हॅपीनेसच्या आयामांवर समृध्द करण्यासाठी स्वराज्याचे मानसशास्त्र कसे वापरता येईल यावर प्रत्येकाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

**संदर्भ :-**

- *महान शिवाजी : खंड १ आणि खंड २*, डॉ. बाळकृष्ण (संपा. डॉ. जयसिंगराव पवार), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- *महान शिवाजी : खंड ३ आणि खंड ४*, डॉ. बाळकृष्ण (संपा. डॉ. जयसिंगराव पवार), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- *झुंज नियतीशी*, मेघा देशमुख- भास्करन, मंजुल पब्लिशिंग हाउस, दिल्ली.
- *गानिमी कावा*, नामदेवराव जाधव, राजमाता प्रकाशन, मुंबई.
- *प्रतिइतिहास*, चंद्रशेखर शिखरे, जिजाई प्रकाशन, पुणे.
- *शिवाजी कोण होता?*, गोविंद पानसरे, कोल्हापूर
- *स्वराज्याचे मानशासस्त्र*, तानाजी पोवार, विवेक पब्लिकेशन, कोल्हापूर.
- *छत्रपती शिवाजी महाराज*, कृष्णराव केळुसकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.